ग्राहक संरक्षण कायदा, १९८६
राज्य आयोग, राज्य आयोगाचे नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ आणि जिल्हा मंच कार्यालयासाठी निर्माण करण्यात आलेल्या ४९७ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१५ ते दि.२९.०२.२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्याबाबत.....

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक : ग्रासंक-२०१५/१४७/प्र. क्र.४०/ ग्रा.सं.-४
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दि. २७ मार्च, २०१५.

वाचा : -

१) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.क्र.संकीर्ण-२००३/प्र.क्र.४८३/नापु-१४, दि.२६.०६.२००३.
२) शा.नि.वित्त विभाग क्र. असंक १००१ /प्र. क्र. १२ ( भाग-२ ) /२००४ / वि.सु.-१, दि.०४.१०.२००४.
३) शा.नि.अ.ना. पु.व ग्रा. सं. वि. क्र.ग्रासंक १००२/३०८०/प्रक्र.२६१३/ग्रासं.३, दि.२९.१०.२००४
४) शा.नि.अ.ना. पु.व ग्रा. सं. वि. क्र.ग्रासंक १००२/२१५३/प्रक्र.२८१८/ग्रासं.३, दि.२९.१०.२००४
५) शा.नि.अ.ना. पु.व ग्रा. सं. वि. क्र.ग्रासंक १५०५/८१३/प्रक्र.३०८९/ग्रासं.३, दि.११.१०.२००४
६) शा.नि.अ.ना. पु.व ग्रा. सं. वि. क्र.ग्रासंक १२०७/प्रक्र.३७०२/ग्रासं.३ ,दि.०७.०६.२००८
७) शा.नि.अ.ना. पु.व ग्रा. सं. वि. क्र.ग्रासंक १२०८/७४४/प्रक्र.३९९७/ग्रासं.३, दि.०९.०४.२००९
८) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.क्र.वैमाशा २०१४/८२/प्र.क्र.२६/ ग्रा.सं.३ दि.२८.२.२०१४.
९) शा.नि. वि.वि. क्र.पदनि-२०१५/प्रक्र.५/१५/वित्तिय सुधारणा-१,दि.२०.२.२०१५

शासन निर्णय :-

ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ मधील तरतुदींनुसार राज्यात, राज्य स्तरावर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि जिल्हा स्तरावर, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनाने सन २००२ मध्ये ग्राहक संरक्षण अधिनियमात केलेल्या सुधारणांच्या परिणामी राज्य आयोगाचे अनुक्रमे नागपूर व औरंगाबाद येथे परीक्रमा खंडपीठ (सर्कीट बेंच) स्थापन करण्यात आले आहेत. राज्य आयोग, जिल्हा मंचाच्या कामकाजात

वाढ झाल्याने राज्य आयोग व राज्य आयोगाच्या नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठासाठी वेळोवेळी आवश्यकतेनुसार अधिकारी/ कर्मचारी वृंदांची एकूण ४९७ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

सदर यंत्रणेतील एकूण ४९७ अस्थायी पदांना वरील अनुक्रमांक ८ येथील दि. २८.०२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०३.२०१४ ते दिनांक २८.०२.२०१५ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आली होती.

ग्राहक संरक्षण यंत्रणेच्या आस्थापनेवरील या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या एकूण ४९७ अस्थायी पदांना दि. ०१.०३.२०१५ ते दि. २९.०२.२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास खालील नमूद अटींच्या अधीन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) प्रस्तावित ४९७ पदांपैकी कोणतेही पद सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त नसावे.
२) सदर पदांवरील वेतनाचा खर्च वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.
३) प्रस्तावित पदे ही सुधारित आकृतीबंधातील असून त्यामुळे सुधारित आकृतीबंधात बदल होणार नाही अथवा संवर्गातही बदल होणार नाही.
४) आढाव्याची कार्यवाही दरवर्षी करण्यात येईल.

२. या विभागाच्या अखत्यारीतील विविध विभाग प्रमुखांच्या आस्थापनेवरील पदांच्या आढाव्याला उच्चस्तर समितीने अंतिमत: मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सुधारीत आकृतीबंध घोषित करण्याबाबत अनुक्रमांक १ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये राज्य आयोग व जिल्हा मंचाच्या आस्थापनेवरील एकूण २८३ मंजूर पदांचा समावेश आहे.

३. यासाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक एम २- २४०८ अन्न साठवण व वखार साठवण (०४) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये राज्य परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंच स्थापना करणे (०४) (०१/०२) मुंबई शहर/मुफसल (२४०८०२५१/०२६२)०१ वेतन" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४ सदर शासन निर्णय, शासन निर्णय वित्त विभाग असंक-१००१/प्र.क्र.१२(भाग-२)/ २००४/ वि.सु.-१, दि. ०४.१०.२००४ व शासन निर्णय क्र. पदनि-२०१५/प्र. क्र. ५/१५/वित्तीय

सुधारणा-१, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(शुभांगी पोटे)
कार्यासन अधिकारी
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

प्रति,

महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, नागरी पुरवठा मंडळ, मुंबई. (द्वारा-वित्तीय सल्लागार व उप सचिव, मुंबई.)
वित्त विभाग (व्यय-४/ अर्थसंकल्प-१६/वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई.
वित्तीय सल्लागार, व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, प्रशासकीय महाविद्यालयाजवळ, मुंबई.
विधी प्रबंधक, राज्य आयोगाचे नागपूर परिक्रमा खंडपीठ, प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर.
विधी प्रबंधक, राज्य आयोगाचे नागपूर परिक्रमा खंडपीठ, औरंगाबाद महापालिकेचे कॉम्प्लेक्स, जय टॉवरजवळ, पदमपूरा, औरंगाबाद.
सर्व प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच.
निवडनस्ती, ग्रा.सं.-४.

## प रि शि ष्ट - अ

शासन निर्णय, क्र. ग्रासंक २०१५/१४७ /प्र. क्र.४०/ग्रा.सं.-४, दि. मार्च, २०१५ अन्वये दि.०१.०३.२०१५ ते २९.०२.२०१६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे.

| अ) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
| १ | प्रबंधक (विधी) | १ |
| २ | प्रबंधक | १ |
| ३ | लेखाधिकारी | १ |
| ४ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | ३ |
| ५ | लघुलेखक (निम्न श्रेणी ) | २ |
| ६ | अधिक्षक | २ |
| ७ | जनसंपर्क अधिकारी | १ |
| ८ | शिरस्तेदार | ३ |
| ९ | सहायक अधिक्षक | २ |
| १० | वरिष्ठ लिपिक | २ |
| ११ | वरिष्ठ अभिलेखापाल | १ |
| १२ | लिपिक टंकलेखक | ६ |
| १३ | बेलिफ | १ |
| १४ | वाहन चालक | १ |
| १५ | पोलीस शिपाई | १ |
| १६ | शिपाई | ७ |
| १७ | रखवालदार | १ |
| १८ | सफाई कामगार | १ |
| | एकूण | ३७ |

| ब) जिल्हा मंच | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
| १ | प्रबंधक | ४० |
| २ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | ३६ |
| ३ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | ४० |
| ४ | सहायक लेखाधिकारी | ४० |
| ५ | शिरस्तेदार | ४० |
| ६ | सहायक अधिक्षक | ४० |
| ७ | अभिलेखापाल | ४० |
| ८ | लिपिक टंकलेखक | ७६ |
| ९ | शिपाई | ८० |
| | एकूण | ४३२ |

| क) राज्य आयोगाचे नागपूर परिक्रमा खंडपीठ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
| १ | प्रबंधक (विधी) | १ |
| २ | लेखाधिकारी | १ |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | २ |
| ४ | शिरस्तेदार | २ |
| ५ | अधिक्षक | १ |
| ६ | लिपिक टंकलेखक | ३ |
| ७ | शिपाई | ३ |
| ८ | रखवालदार | १ |
| | **एकूण** | १४ |

| ड) राज्य आयोगाचे औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
| १ | प्रबंधक (विधी) | १ |
| २ | लेखाधिकारी | १ |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | २ |
| ४ | शिरस्तेदार | २ |
| ५ | अधिक्षक | १ |
| ६ | लिपिक टंकलेखक | ३ |
| ७ | शिपाई | ३ |
| ८ | रखवालदार | १ |
| | **एकूण** | १४ |
| | **एकूण अ + ब + क + ड** | ४९७ |